SONOPANT DANDEKAR ARTS, V.S. APTE COMMERCE AND M.H. MEHTA SCIENCE COLLEGE, PALGHAR

## Department of Economics

# PROJECT REPORT

## TYBA- ECONOMICS

**Academic Year 2022-2023**

Prepared by
**Department of Economics**
**Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce and M.H. Mehta Science College, Palghar**

# INDEX


| Sr. No. | Content |
|---|---|
| 1 | Notice for Project Submission |
| 2 | Curriculum where course (subject where project work/ field work is required) |
| 3 | List Learners with Project titles |
| 4 | Sample Projects |

Sonopant Dandekar Shikshan Mandali's
Sonopant Dandekar Arts,
V. S. Apte Commerce &
M. H. Mehta Science College, Palghar
Estb.: 14 August 1968
Dr. Kiran Save, Principal

Kharekuran Road, Palghar (W), Tal. & Dist. Palghar,
Maharashtra - 401 404, INDIA
Tel. : +91 - 2525 - 252163
Principal : +91 - 2525 - 252317
Email : sdsmcollege@yahoo.com
Web. : www.sdsmcollege.com

Ref No.:

Date : 01/10/2022

# Important Notice

## Department of Economics

All Third Year BA Economics students are hereby informed to submit their projects of Paper No. VI and IX to the Department of Economics within seven days. Who student does not submit a project will not be awarded project marks.

**Prof. Minal Saptarshi**
Asst. Professor
Department of Economics

**Dr. Kiran J. Save**
Principal

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College,
V.S. Apte Commerce College &
M.H. Mehta Science College
PALGHAR (W.R.)
Dist. Palghar, Pin-401404

Revised
As per letter No. AA/ICD/2018-19/542.
dt. 10/10/2018

**UNIVERSITY OF MUMBAI**
No. UG/58 of 2018-19

**CIRCULAR:-**

Attention of the Principals of the Affiliated Colleges and Directors of the recognized Institutions in Humanities Faculty is invited to this office circular No. UG/270 of 2017-18, dated 26th October, 2017 relating to syllabus of Bachelor of Arts.

They are hereby informed that the recommendations made by the Board of Studies in Economics at its meeting held on 18th May, 2018 have been accepted by the Academic Council at its meeting held on 14th June, 2018 vide item No. 4.3 and that in accordance therewith, the revised syllabus as per the (CBCS) for the T.Y.B.A. in Economics – Sem V & VI has been brought into force with effect from the academic year 2018-19, accordingly. (The same is available on the University's website www.mu.ac.in).

MUMBAI – 400 032
6th ~~June~~ July, 2018

(Dr. Dinesh Kamble)
I/c REGISTRAR

To

The Principals of the affiliated Colleges and Directors of the recognized Institutions in Humanities Faculty. (Circular No. UG/334 of 2017-18 dated 9th January, 2018.)

**A.C./4.3/14/06/2018**

****************

No. UG/58 -A of 2018 MUMBAI-400 032 6th ~~June~~ July, 2018

Copy forwarded with Compliments for information to:-

1) The I/c Dean, Faculty of Humanities,
2) The Chairman, Board of Studies in Economics,
3) The Director, Board of Examinations and Evaluation,
4) The Director, Board of Students Development,
5) The Professor-cum-Director, Institute of Distance and Open Learning (IDOL),
6) The Co-Ordinator, University Computerization Centre,

28/6/18

(Dr. Dinesh Kamble)
I/c REGISTRAR

AC 14-6-18

Item No. 4.3

# University of Mumbai

University of Mumbai

शीलवृत्तफला विद्या

1857

# Revised Syllabus

# Sem. V & Sem. VI

# Program: B. A.

# Course: Economics

(As per the Credit Based Semester and Grading System with effect from the academic year 2018-2019)

**PREAMBLE**:

The syllabus of TYBA has been revised by keeping in view of the recent trends in the subject of economics. The Board of Studies in Economics has revised the syllabi of papers at the TYBA which will be made effective **from the Academic Year 2018-19**. In this revision, some of the existing optional papers have been replaced by new papers. A broad overview of the structure, followed by the syllabi of individual papers, is given below.

**DURATION:**

- The course shall be a full time course.
- The duration of B.A. course shall be of Three years /Six Semesters.

  FYBA: SEMESTER – I & II (One paper each semester)

  SYBA: SEMESTER – III & IV (Two papers each semester)

  TYBA: SEMESTER – V & VI (Six papers each semester)

**PATTERN:**

The T.Y.B. A. [Entire Economics] Course shall have 12 papers. Every semester shall have six papers, each carrying 100 marks. However students can opt combination of any two subjects (Economics and any other subject) in which every semester shall have three papers of each subject, carrying 100 marks. Moreover, Papers IX and Papers XII of Semester V and Paper XV and XVIII Semester VI are bifurcated into 80 marks of written exam and 20 marks of project. It is hereby stipulated to have a maximum page limit of 20 for the project.

**SCHEME OF EXAMINATION:**

The duration of the examination, paper pattern and the allotment of lectures as well as marks are given in detail as follows:

**Duration:**

- **Three Hours** for each 100 marks paper and Two and Half an Hour for 80 marks paper.

**Allotment of Lectures**:

- The allotment of lectures is as per the common guidelines stipulated by the Academic Council for Humanities of University of Mumbai.

**Paper Pattern:**

- There shall be five questions each of 20 marks, for 100 marks paper divided into three sub questions (a, b, c,) with an internal option to choose any two.
- There shall be four questions of 20 marks for 80 marks paper with internal options mentioned as the same above.
- All questions shall be compulsory with internal choice within the questions.
- Questions may be subdivided into sub-questions a, b, c as mentioned earlier and the allocation of marks shall depend on the weightage given to the topic.

| Questions | Modules | Marks |
|---|---|---|
| Qn.1 | Unit I | 20 |
| Qn.2 | Unit II | 20 |

## SONOPANT DANDEKAR ARTS, V.S. APTE COMMERCE AND M.H. MEHTA SCIENCE COLLEGE, PALGHAR

**Class: TYBA** **Academic Year: 2022-2023**

**Subject: History of Economic Thoughts – II** **Semester : VI**

| Sr. No. | Roll No. | Name of the Student | Title of the Project | Signature |
|---|---|---|---|---|
| 1 | 694 | GAVIT ANIL JAHANGIR | डॉ.बाबा साहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | Anil |
| 2 | 666 | GUHE SUJAY GANPAT | डॉक्टर . बाबा साहेब आंबेडकर | Sguhe |
| 3 | 766 | JAISWAL MUNNA OMPRAKASH | महात्मा ज्योतीराव फुले | MJaiswal |
| 4 | 759 | KACHARE ROSHAN EKNATH | अमर्त्य सेन यांची माहिती | Rkachre |
| 5 | 673 | KOLHEKAR KARAN SHANTARAM | महादेव गोविंद रानडे | Karan |
| 6 | 671 | KOMB HAUSA NATHU | गोपाल कृष्ण गोखले | NKomb |
| 7 | 634 | LILKA JANAKI JANYA | दादा भाई नोरोजी यांची माहिती | [illegible] |
| 8 | 50006 | SHINGADA BHARAT DEVU | महात्मा ज्योतीराव फुले | Bhingda |
| 9 | 771 | YADAV SONAJ RAMFER | Absent | Ysanaj |

महाविद्यालयाचे नाव :- सोनोपंत दांडेकर
महाविद्यालय पालघर.

विद्यार्थ्याचे नाव :- रोशन एकनाथ कयरे.

विषय :- अर्थशास्त्र - (Economics)

प्रकल्पाचे विषय :- अमर्त्य सेन यांची माहिती

वर्ग :- TYBA

शैक्षणिक वर्ष :- 2022-23

विभाग :- BA

सेमिस्टर :- 6

हजेरी क्रमांक : 759

मार्गदर्शक :- मिनल मॅडम.

FOR EDUCATIONAL USE
Sundaram®

# अनुक्रमणिका

| अं क्र | शीर्षक | सही | मार्क |
| --- | --- | --- | --- |
| ०. | विद्यार्थ्यांची माहिती. | | |
| 1. | प्रस्तावना. | | |
| 2 | अमर्त्य सेन यांचे प्रारंभिक जिवन. | | |
| 3 | जीवन परिचय. | | |
| 4 | अमर्त्य सेन यांचे आर्थिक विचार.<br>1- दुष्काळाचे विश्लेषण<br>2- दारिद्र्य<br>3- आर्थिक विषमता<br>4- कल्याणकारी अर्थशास्त्र | | |
| 5. | सामाजिक निवड. | | |
| 6. | सामाजिक क्षमतांचा विकास<br>अ- शिक्षण<br>ब- आरोग्य | | |

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

क - आहार

7. अमर्त्य सेन पुरस्कार

8. अमर्त्य सेन यांच्या ~~विसांचे~~ विचारांचे मूल्यमापन

9. संदर्भ सुची

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# 1. प्रस्तावना

मुंबई विद्यापीठ अंतर्गत शिकवल्या जाणाऱ्या आर्थिक विचारांच्या इतिहास या अर्थशास्त्र विषयात विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला व कौशल्याला वाव देण्यासाठी व्यवसायाबाबत प्राथमिक माहिती मिळवून अभ्यासत यावी व त्या व्यवसायाबाबत मुलांच्या मानसिकतेत बदल करून स्वयंरोजगार निर्माण करण्याच्या दृष्टीने कौशल्य आत्मसात करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने अर्थशास्त्र विषयासाठी 20 गुणां-साठी प्रकल्प अनिवार्य केला आहे. त्या अनुषंगाने मी राष्ट्रीय सहकारी आर्थिक विचारांचा इतिहास या पुस्तकातून अमर्त्य सेन या अर्थशास्त्रज्ञांचा विषय अभ्यासासाठी निवडला असून त्याची सविस्तर माहिती सदर प्रकल्पात मांडली आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# 2. अमर्त्य सेन यांचे प्रारंभिक जीवन

नाव : अमर्त्य सेन

जन्मतारीख : 3 - 11 - 1933

वय : 87 वर्षे (2020 प्रमाणे)

जात : ब्राम्हण

जन्म ठिकाण : शांतिनिकेतन, बंगाल

वडिलांचे नाव : आशुतोष सेन

पत्नीचे नाव : अमिता सेन

शिक्षण : पीएचडी

पुरस्कार : भारतरत्न

FOR EDUCATIONAL USE

# 3. जीवन परिचय

डॉ. अमर्त्य सेन यांचा जन्म दि. 3 नोव्हेंबर, 1933 रोजी शांतिनिकेतन येथे झाला. अमर्त्य सेन यांची आई अमिता सेन ही उच्चशिक्षित कवयित्री व साहित्यिक आणि विशेष म्हणजे रविंद्रनाथ टागोरांची हुशार विद्यार्थिनी होती. अमर्त्यांचे वडिल रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. खुद्द रविंद्रनाथ टागोरांनी सेन घराण्यातील या कुलदीपकाचे नाव 'अमर्त्य' हा मुलगा ज्ञात जगाच्या पलीकडे जाईल आणि एक दिवस असामान्य माणूस नावारूपास येईल.

अमर्त्य सेन यांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासून ते सहाव्या वर्षापर्यंतचे बालपण ब्रम्हदेशात गेले. तेथून परतल्यानंतर सेंट ग्रेगॉरी या शाळेत काहीसे प्राथमिक शिक्षण त्यांनी घेतले. शांतीनिकेतन येथे त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. ते लहानपणापासूनच खूप बुद्धिमान आहेत. सातवीच्या वर्गात असतानाच त्यांनी 'संथाल' या आदिवासी जमातीच्या निरिक्षणावरुन लेख लिहिला होता. पदवी शिक्षणासाठी प्रेसिडेन्सी महाविद्यालयात त्यांनी प्रवेश मिळविला. त्यानंतर त्यांनी इंग्लंडमध्ये केंब्रिजमधील ट्रिनिटी महाविद्यालयात प्रवेश घेतला. नंतर 1955 मध्ये त्यांनी पीएच. डी साठी केंब्रिज विद्यापीठात नाव दाखल केले. श्रीमती जोन रॉबिन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएच. डी. ही पदवी संपादन केली. "The choice of Technique" हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. प्रसिद्ध अर्थशास्त्र मॉरिस डॉब याचे सहकार्य त्यांना लाभले वयाच्या अवघ्या पंचविशीतच त्यांनी पीएच. डी. ही सर्वोच्च पदवी प्राप्त केली.

अमर्त्य सेन यांनी ट्रिनिटीत सहा वर्षाची फेलोशिप पूर्ण केली. सन 1963 मध्ये भारतात आले. सन 1962 ते 1971 या काळात त्यांनी दिल्ली स्कूल ऑफ

इकॉनामिक्स' या संस्थेत प्रध्यापक म्हणून सेवा केली. सन 1971 मध्ये ते परत इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मध्ये सहा वर्षांपर्यंत नोकरी केली. 1977 मध्ये ऑक्सफर्डच्या नाफिल्ड महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून ते रुजू झाले. सन 1980 मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठात प्राध्यापकपदी त्यांची नियुक्ती झाली. सन 1987 ते 1998 या कालावधीत अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्र व तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी कार्य केले. सन 1998 पासून इंग्लंडमधील ट्रिनिटी महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्य सुरु केले. याच वर्षी त्यांना 'नोबेल पारितोषिक' जाहीर झाले.

डॉ. अमर्त्य सेन यांनी अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचे अध्यक्षपद भूषविले आहे. अमेरिकन इकॉनॉमिक असोसिएशन, इकॉनॉमेट्रीक सोसायटी आदी संस्थांचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले आहे. त्यांनी एकूण 20 मौलिक ग्रंथ आणि 230 पेक्षाही अधिक शोधनिबंध लिहिले. त्यांनी निरनिराळी पारितोषिक संपादन केली आहेत. ॲडम स्मिथ पारितोषिक, स्टीव्हनसन पारितोषिक, भारतातील महालनोबिस पारितोषिक इत्यादी बहुमान त्यांनी प्राप्त केला आहे. कल्याणाचे अर्थशास्त्र' या विषयातील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक निवड, दारिद्र्याचे मापन, कल्याणकारी अर्थशास्त्र, दुष्काळ, आर्थिक विषमता, उत्पन्नाचे वाटप, अविकसित देशांचे प्रश्न इत्यादी विषयांवर त्यांनी प्रामुख्याने संशोधन केले आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# 4. अमर्त्य सेन यांचे आर्थिक विचार.

## 1 दुष्काळाचे विश्लेषण

Poverty and Famines - An Essay on Entitlement and Deprivation या ग्रंथात डॉ. अमर्त्य सेन यांनी दारिद्र्याबरोबर दुष्काळाचीही मीमांसा केली आहे. सन 1943 चा बंगालमधील मोठा दुष्काळ छोट्या अमर्त्य सेनने पाहिला होता. जवळपास 6 कोटी लोक या दुष्काळाने प्रभावित होते. वृद्ध, बालके, स्त्रिया गरीब या सर्वांची ससेहोलपट त्यांनी पाहिली होती. दुष्काळाचे संकट का उद्भवले याचा विचार त्यांनी सुरु केला. त्यांनी बांगला देश, इथोपिया, कोरिया, सहारा, चीन आणि भारतातील इतर दुष्काळांचा अभ्यास केला. दुष्काळाच्या काळात धान्याची टंचाई नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. गरिबांना क्रयशक्ती अथवा अभावी धान्याची खरेदी करता येत नव्हती. सर्वच दुष्काळ हे नैसर्गिक आपत्तीने निर्माण होत नाहीत असे मत सेन यांनी मांडले. जगातील बरेच दुष्काळ, मानवनिर्मित आहेत. पुढील प्रमुख कारणांनी दुष्काळ उद्भवतो असे म्हणाले.

अ] धान्याच्या गतिक्षमतेचा अभाव.
ब] सरकारला धान्याच्या माहितीचा अभाव.
क] गरिबांकडील क्रयशक्तीचा अभाव
ड] गरीबांना रोजगारसंधीचा अभाव
इ] दुष्काळाच्या प्रारंभीच्या काळातील सरकारची उदासीनता
ई] व्यापाऱ्यामार्फत होणारी साठेबाजी
फ] धान्याच्या काळ्या, बाजाराविरुद्ध उपायांचा अभाव
भ] दुष्काळ मदतीचे अयोग्य व्यवस्थापन.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

ग) साक्षरता, शिक्षण आणि पुरेशा आरोग्य काळजीचा अभाव. अमर्त्य सेन यांच्या मते, दुष्काळी स्थितीमुळे प्रामुख्याने गरीब मुले, वृद्ध महिला व इतरांचे नुकसान होते.

सेन यांच्या अभ्यासामुळे समाजातील दुर्बल घटकांच्या अडचणी व समस्या अधोरेखित झाल्या. सन 1974 मध्ये बांगला देशातील महापूराची स्थिती निर्माण झाली. धान्य पिकांच्या लागवडी अभावी शेत मजुरांना पुरेसा रोजगार प्राप्त झाला नाही. लोकांची क्रयशक्ती घटली. भूकबळींचे प्रमाण वाढले. याच काळात महाराष्ट्रातही दुष्काळ पडला असला तरी रोजगार हमी योजनेमुळे लोकांची क्रयशक्ती वाढली होती. यामुळे भूकबळीचा प्रश्न उद्भवला नाही. सहारा देशातही दुष्काळी स्थितीत रोजगारा अभावी क्रयशक्ती घटली भूकबळींचे प्रमाण मोठे राहिले. या संदर्भातील अभ्यास करुन अमर्त्य सेन म्हणतात की, जे देश स्वतंत्र आहे, तेथे नियमित निवडणूक घेतात, सत्ताधारी पक्षावर टीका करणारा प्रभावी विरोधी पक्ष असतो, वृत्तपत्रांना पुरेसे स्वातंत्र्य असते, अशा लोकशाहीप्रधान राष्ट्राला दुष्काळाने कधीच पीडित केलेले नाही. एकंदरीत, दुष्काळावर मात करण्याच्यादृष्टीने सरकारी हस्तक्षेपाला असलेले महत्त्व आणि सामुदायिक कृतीची गरज डॉ. सेन यांनी व्यक्त केली.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# २ दारिद्र्य

डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, दारिद्र्य निर्मूलनासाठी दारिद्र्याचे अचूक मापन करणे आवश्यक आहे. दारिद्र्याचे प्रमाण ठरविण्यासाठी विशिष्ट उत्पन्न पातळी किंवा विशिष्ट उष्मांक पातळी ठरविली जाते. विशिष्ट उत्पन्न पातळीपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या सर्वांचा समावेश दारिद्र्यात केला जातो. व्यक्तीला किमान गरजा भागविता येण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न प्राप्त होत नसेल तर त्या व्यक्तीचा अंतर्भाव दारिद्र्य रेषेखालील केला जातो; पण दारिद्र्यरेषेची ही संकल्पना डॉ. सेन यांनी अमान्य केली. भारतात लॉरेंझ गुणोत्तर आणि गिनी सहगुणांक वापरुन दारिद्र्याचे प्रमाण व दिशा यांचे मापन केले जाते. गिनी सहगुणांक हे आर्थिक विषमतेचे सापेक्ष मोजमाप आहे. अमर्त्य सेन यांनी मात्र दारिद्र्याचे निरपेक्ष मोजमाप करण्यासाठी 'p' मापन सुचविले.

अमर्त्य सेन यांनी दारिद्र्याचा निर्देशांक काढण्यासाठी पुढील सूत्र सुचविले.

$$p = \frac{2}{(q+1)\,n^2} \sum_{i=1}^{q} (z - y_i)(q + q - i)$$

येथे $p$ = दारिद्र्याचे प्रमाण

$n$ = लोकसंख्येचे आकारमान

$y$ = प्रमाणानुसार वाढत्या क्रमाने मांडलेले व्यक्तिगत उत्पन्न

Sundaram® FOR EDUCATIONAL USE

q = दारिद्र्यरेषेवर अथवा दारिद्र्यरेषेखालील उत्पन्न मिळविणाऱ्या लोकांची संख्या

z = उत्पन्नाची किमान स्वीकार्य पातळी किंवा दारिद्र्य पातळी

दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या फार मोठी असल्यास $q/q+1$ किंवा $q+1/q=1$ असते.

याबाबतीत सेन निर्देशांक पुढीलप्रमाणे मांडता येतो.

$$S = \left(\frac{q}{n}\right)\left(\frac{1}{2}\right)\{z - M(1-G\}$$

सेनच्या मते, S ही संख्या 0 ते 1 या दरम्यान असते. कारण सर्वच व्यक्तींना दारिद्र्यरेषेपेक्षा जास्त उत्पन्न प्राप्त होत असेल तर $S=0$ होईल याउलट कोणालाच काही उत्पन्न मिळत नाही तेव्हा गरिबांचे सरासरी उत्पन्न म्हणजेच M हे 0 होते. तसेच, $q=n$ होईल. दारिद्र्यरेषेखालील लोकांमधील दारिद्र्याचे वाटप सेनच्या निर्देशांकावरुन स्पष्ट होते.

सर्वप्रथम 1973 मध्ये नियोजन आयोगाने दारिद्र्यरेषा ठरविण्यासाठी एका कृतिदलाची नेमणूक केली. या कृतिदलाने दारिद्र्याच्या निरपेक्ष निकष म्हणून दारिद्र्य टोपली, ही संकल्पना सुचवली. या टोपलीत त्यांनी अन्न हा घटक बसवला. किमान दोन्ही वेळचे अन्न मिळवू न शकणारा म्हणजे ही टोपली आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

अमर्त्य सेन यांनी असे मत मांडले की, केवळ मोठी कारखाने उभारुन अविकसित देशांच्या विकास साधता येणार नाही. त्यासाठी मानवी संसाधनांमध्ये मोठी गुंतवणूक करणे आवश्यक ठरते. आयुर्मान, प्रौढ साक्षरता, शिक्षण आदी बाबींचा समावेश यात होतो. दारिद्र्य दूर करण्यासाठी लोकांना रोजगार संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यांची खरेदीशक्ती वाढल्याशिवाय दारिद्र्य दूर होणार नाही. खरेदीशक्ती वाढल्यास दुष्काळ व उपासमारीच्या संकटावरही मात करता येईल असे विचार अमर्त्य सेन यांनी मांडले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# 3 आर्थिक विषमता

आर्थिक विषमतेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वितरणातील तफावत लक्षात घेतली जाते. दारिद्र्य व आर्थिक विषमता या दोन्ही बाबी एकमेकांशी संबंधित आहेत. आर्थिक विषमता वाढल्यास दारिद्र्याची समस्या गंभीर बनते. सेन यांनी उत्पन्न वितरणातील विषमता या संदर्भात मोठे संशोधन केले. विषमता लक्षात घेणारी दारिद्र्याची संकल्पना मांडली. त्यांनी भारतातील गरिबी व आर्थिक विषमता या संदर्भात मोठे संशोधन केले. भारतात किमान वास्तव दरडोई उत्पन्न साध्य करण्याच्या ध्येयाबाबत अधिकृत दृष्टिकोन सन 1960-61 मध्ये स्वीकारण्यात आला. उत्पन्न वाटपातील विषमतेचे निवारण करण्यासाठी उच्च उत्पन्न वृद्धी दराचे लक्ष्य ठरविण्यात आले. दांडेकर-रथ यांनीही दारिद्र्याचा विचार करताना उत्पन्न-उपभोगातील तफावत लक्षात घेतली. याबाबत अमर्त्य सेन म्हणतात, दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या उत्पन्नाचे आणि उपभोगाचे वितरणही लक्षात घेणे आवश्यक आहे. दारिद्र्यरेषेखालील प्रारंभीचे वितरण थोड्या बहुत फरकाने कायम राहते, असे गृहीत धरावे लागते. जर हे वितरण दारिद्र्य रेषेच्या बाजूने अधिक झुकले असेल तर सेन तफावत (Sen Gap) अधिक राहील. याबाबतीत सेन यांनी पुढील सूत्र सांगितले आहे.

$$P = [\,I + (1-I)\,G\,]\,H$$

येथे $P$ = दारिद्र्य निर्देशांक

$I$ = वितरणाचे परिमाण

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

G = गिनीचा सहगुणांक

H = दारिद्र्य रेषेखालील लोकांचे दरडोई मापन

सेन यांनी स्वीकारलेल्या पद्धतीनुसार विषमतेचे परिणाम दारिद्र्य रेषेच्यावर असल्यासारखे वाटते. गरिबांच्या उपभोगातील वस्तूंच्या किंमत निर्देशांक घटल्यास दारिद्र्य निर्देशांक घटेल. याउलट अशा वस्तूंची किंमत निर्देशांक वाढल्यास दारिद्र्य निर्देशांकात वाढ होईल. गरिबांच्या संख्येत वाढ झाल्यास सरासरी मध्य उपभोग घटेल. तसेच वेतन वस्तूंच्या उत्पादनात घटत्या फलाची प्रचिती येत असेल तर दारिद्र्यरेषा वर सरकेल. सेन यांनी सांगितलेले वरील परिमाण हे दारिद्र्य रेषा गटातील वितरणातील बदलाचे मापदंड, वेतन - वस्तूंच्या किंमत निर्देशांकातील बदल उत्पादकतेतील बदलाने वेतन - वस्तूंच्या सापेक्ष किंमतीतील बदल यांच्याशी संवेदनशील असते.

FOR EDUCATIONAL USE

# ५. कल्याणकारी अर्थशास्त्र

अमर्त्य सेन यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राला नवीन दिशा दिली. त्यांनी आर्थिक विकास प्रक्रियेत मानवी दृष्टिकोनाचा पुरस्कार केला. सेन यांच्या मते, केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढल्याने आर्थिक विकास होत नाही. उत्पन्नाचे वितरण समानतेने झाले पाहिजे. देशातील प्रत्येक व्यक्तीला सक्षम बनवून ही समानता निर्माण करता येईल. अर्थात यासाठी प्रत्येकाकडे असलेल्या क्षमतेचा विकास करण्याची समान संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. सेन यांच्या मते, व्यक्तिगत कल्याणात प्रामुख्याने व्यक्तिगत निवड व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचा समावेश होतो. सामूहिक निवड व सामाजिक कल्याणविषयक संशोधन करताना सामाजिक निवडीशी संबंधित अधिकार आणि स्वातंत्र्य यांचा त्यांनी विचार केला. व्यक्तिगत स्वातंत्र्याचे त्यांनी जोरदार समर्थन केले.

सेन यांचा 'collective choice and social welfare' हा ग्रंथ म्हणजे कल्याणकारी अर्थशास्त्र आणि नैतिक तत्त्वज्ञान यांचा सुंदर मिलाप आहे. अमर्त्य सेन यांनी ॲरोच्या अशक्यता प्रमेयावर टीका केली. ॲरो यांनी काढलेला नकारात्मक निष्कर्ष सेन यांना मान्य नव्हता. सेन यांच्या मते, ॲरोच्या विश्लेषणातून निराशावादी निष्कर्ष निघण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्याची दोन चुकीची गृहीते होय. पहिले गृहित म्हणजे कल्याण निर्देशांक म्हणून केवळ उपयोगितेचा विचार करणे आणि दुसरे गृहीत म्हणजे आंतर - व्यक्तीय तुलना होय.

सेन म्हणतात की, विशिष्ट परिस्थितीत काही अटी पुर्ण करुन लोकशाही व्यवस्थेत व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तीचे हक्क कायम ठेवून सुद्धा व्यक्तीला पसंती वरुन संपूर्ण समाजाची निवड निर्धारित करणे शक्य आहे. ॲरोने म्हटल्याप्रमाणे, हुकुमशाहीची निवड हीच संपूर्ण समाजाची निवड मानणे आणि व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तीचे हक्क यांची गळचेपी करणे आवश्यक नाही असे यांच्या अशक्यता प्रमेयाने 1950 च्या दशकात कल्याणकारी अर्थशास्त्राच्या विकासात मोठा अडथळा निर्माण झाला होता. 1960 च्या दशकात डॉ. अमर्त्य सेन यांच्या अभ्यासपुर्ण प्रयत्नामुळे हा अडथळा दूर झाला. सेन यांनी आदर्शवादी अर्थशास्त्राला नवीन दिशा दिली. बहुमताचा नियम, व्यक्तीचे अधिकार व कल्याण आदींशी संबंधित समस्यांचाही त्यांनी चर्चा केली. अर्थशास्त्र हे आर्थिक व सामाजिक स्वरुपाचे असले तरी ते नैतिकतेशीही काही प्रमाणात निगडित आहे. असे सेन यांना वाटते. म्हणून अर्थशास्त्रात भौतिक व सामाजिक विकासाबरोबर नैतिकमुल्यांचा अभ्यास केला पाहिजे, असे मत त्यांनी मांडले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# 5- सामाजिक निवड

अमर्त्य सेन यांनी 'सामाजिक निवडीचे' विश्लेषण केले. या संदर्भात ॲरो यांच्या अशक्यता प्रमेयाचे डॉ. सेन यांनी खंडन केले. ॲरो यांनी व्यक्तिगत निवडीवर आधारित सामूहिक निवड गृहीत धरली होती. व्यक्तिगत निवडीचा क्रम लावून हुकूमशाही व्यवस्थेत ते साध्य करता येईल. अशी निवड लोकशाहीशी सुसंगत नसते असे यांचे मत होते. ॲरोच्या सामान्य अशक्यता प्रमेयाऐवजी 'सामान्य शक्यता प्रमेय', विकसित करण्याचा प्रयत्न डॉ. सेन यांनी केला. व्यक्तिगत पातळीवरील समांतर आधार खुले करून सेन यांनी स्वतंत्र सामाजिक कल्याण फलन मांडण्याचा प्रयत्न केला.

डॉ. सेन यांच्या मते हुकुशाही पद्धतीने -च सामाजिक निवड निर्धारित करण्याची गरज नाही. लोकशाही व्यवस्थेतही लोकांचे अधिकार व स्वातंत्र्य अबाधित राखून सामाजिक निवड ठरविता येते. सेन यांच्या मते, पुढील पाच अटींच्या पूर्ततेने आर्थिक धोरणाची सामूहिक निवड करणे शक्य आहे.

1) व्यक्तिगत पसंतीवर मर्यादांचा अभाव

2) व्यक्तिगत पसंती व सामुदायिक पसंतीतील समानतेचा विचार करून निर्णय होणे.

3) सामुदायिक निवड अधिक पद्धतशीर करणे.

4) इतरांची उपयोगिता स्थिर राहून किमान एका व्यक्तीच्या उपयोगितेत वाढ घडून येणे. सामाजिक कल्याणातील वाढीबाबतचा हा पॅरेटो नियम आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

5) पसंती प्रक्रियेत बहुतांशाच्या निवडी लक्षात घेणे.

एकंदरीत सेन यांनी अधिक चांगल्या पद्धतीने सामाजिक कल्याण फलन मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी या कल्याण फलनात व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि संस्थात्मक माहिती यासारख्या विभिन्न घटकांचा समावेश केला. यामुळे सामाजिक विकासाकरिता सामुदायिक कृती व नियोजनाच्या संदर्भात मूलभूत चोकट उपलब्ध झाली. बिगर - उपयोगितेच्या माहितीत सेन यांनी हक्क, उत्पन्न, नैतिकता, आणि सर्व संस्थात्मक तत्परता यांचा समावेश केला आहे.

## ६- सामाजिक क्षमतांचा विकास

सेन यांनी सामाजिक क्षमतांना 'प्रमुख याम किंवा 'समानतेसाठीचा वाव' असे म्हटले आहे. क्षमता हा व्यक्तीच्या योग्य जगण्याशी निगडित आहे. व्यक्तीला इच्छेप्रमाणे चांगले जीवन जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. व्यक्तीच्या जीवनाच्या गुणवत्तेवरुन त्याचे योग्य जगणे लक्षात होता येते. याबाबतीत व्यक्तीला मिळणारा आनंद, स्वाभिमान, सामुदायिक जीवनातील सहभाग इत्यादीद्वारे व्यक्तीची यशप्राप्ती पाहता येते. सेन यांच्या मते, व्यक्ती साध्य करु शकणाऱ्या कार्यांचे विविध संयोग म्हणजे 'क्षमता' होय. शक्य जीवनाच्या निवडीचे स्वातंत्र्य क्षमतांमुळे प्राप्त होते. प्रत्येक व्यक्तीकडील क्षमता भिन्न असते. अशा क्षमतांचा विकास साधल्यास व्यक्तीला अधिक चांगले व दर्जेदार 'जीवन' जगता येईल. व्यक्तीच्या विकासात समानता आढळत नाही. त्यांच्याकडील क्षमतांचा विकास साधण्यासाठी त्यांना समान संधी प्राप्त होत नाही. म्हणून या बाबतीत सरकारची भूमिका मोलाची ठरते. लोकांच्या सामाजिक क्षमतांचा विकास साधण्यासाठी सरकारी हस्तक्षेप आवश्यक ठरतो.

व्यक्तीची क्षमता तीन घटकांवर अवलंबून असते. ते घटक म्हणजे शिक्षण, आरोग्य व आहार होय. हे घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## अ- शिक्षण

ज्ञान संपादन करणे आणि जीवनाचे नियोजन करणे या दृष्टीने शिक्षणाला महत्त्व आहे. शिक्षणामुळे वैचारिक क्रांती घडून येण्यास मदत होते. विचारांचे आदानप्रदान घडून येते. समाज परिवर्तनाचे माध्यम म्हणून शिक्षणाकडे पाहता येते. तसेच शिक्षणप्रसार वाढवून देशातील दुर्मिळ साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करता येतो. सेन म्हणतात की शिक्षणाद्वारे लोकांच्या जीवनाचा दर्जा उंचावता येतो. देशात आर्थिक व सामाजिक विकास घडून आणण्यात शिक्षणाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. यासाठी शिक्षण प्रसाराच्या कार्यात सरकारने महत्त्वाची भूमिका बजवावी.

नोबेल पारितोषिक प्राप्त झाल्यानंतर भारत भेटीतील एका व्याख्यानात त्यांनी भारतातील शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या जेमतेम 3 टक्क्यांइतका खर्च होत असल्याच्या बाबीकडे लक्ष वेधले. शिक्षणाहा मूलभूत अधिकार असण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी केरळमधील साक्षरतेचे उदाहरण दिले. केरळ राज्यात साक्षरता अधिक असल्याने जन्मदर व बालमृत्यूदर कमी आहे. तसेच दारिद्र्याचे प्रमाणही तेथे कमी आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## ब- आरोग्य

आर्थिक कल्याणाचे विश्लेषण करताना सेन यांनी आरोग्य हा घटकही लक्षात घेतला. सेन यांच्या मते, आरोग्याच्या पुरेशा सोयी लोकांना उपलब्ध झाल्या पाहिजेत; जेणे करुन रोगराई व शारीरिक दुर्बलतेपासून समाजाला मुक्ती मिळेल. कुपोषण व अनारोग्यामुळे कार्यक्षमता घटते. म्हणून सेन म्हणतात. की उत्तम आरोग्यामुळे मानवी संसाधनांची गुणवत्ता वाढते. त्यांची उत्पादकता वाढते. समाजाला सक्षम व सुदृढ बनविण्याकरिता सरकारने आरोग्य सोयींवर पुरेसा खर्च केला पाहिजे.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

क - आहार

उत्तम आरोग्यासाठी लोकांना पुरेसा सकस आहार मिळाला पाहिजे. अविकसित देशातील लोकांचे उत्पन्न अल्प असते. त्यांची क्रयशक्ती कमी असते. दुष्काळाच्या स्थितीत तर त्यांचे दैन्य आणखी वाढते. अशा स्थितीत त्यांना अर्धपोटी व कुपोषित राहावे लागते. याचा विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो. त्यांची कार्यक्षमताही घटते. म्हणून अविकसित देशातील लोकांच्या आहारातील पोषक घटकांची कमतरता भरुन काढण्याच्या उपायांना डॉ. सेन महत्त्व देतात.

सेन यांच्या मते, आर्थिक व्यवहारातून कल्याणाची निर्मिती होते. उत्पन्नामुळे संधी उद्भवतात अशा संधीचे स्वरुप 'क्षमता' सारखे असते. अशी क्षमता उत्पन्नाबरोबर शिक्षण, आरोग्य, आहार या बाबींवरही अवलंबून असते. लोकांच्या क्षमतेचा विकास साधून त्याद्वारे आर्थिक कल्याणाची पातळी वाढविता येते.

अमर्त्य सेन यांनी मानवी कल्याण वाढविण्यासाठी अनेक उपायांची चर्चाही केली आहे. सेन यांच्या मते देशातील सर्वसामान्य व्यक्तींच्या कल्याणा-करिता पुढील महत्त्वाच्या उपायांचा विचार करता येतो.

1) सर्वसामान्यांच्या आरोग्य सोयीकडे लक्ष पुरविणे, त्यांची आरोग्य पातळी सुधारणे

2) लोकांच्या खरेदीशक्ती वाढ घडवून आणणे.

3) देशातील अन्नधान्य वितरण प्रणाली कार्यक्षम बनविणे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

4) शिक्षणाचा सर्वाधिक प्रसार करणे.

5) स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणाच्या व इतर संधी उपलब्ध करुन देणे.

6) क्षमता वाढीसाठी सर्वांना समान संधी उपलब्ध करणे.

7) सरकारी योजना व कार्यक्रमांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचविणे.

8) रोजगारनिर्मितीचा कार्यक्रम राबविणे.

9) गरिबांतील गरिबांच्या उन्नतीकरिता संसाधनांचे वाटप करणे.

10) जमीन सुधारणा कार्यक्रम कार्यक्षमपणे राबविणे.

11) शिक्षण, आरोग्य व आहार यातील सार्वजनिक गुंतवणुकीत वाढ करणे.

12) लोकशाही राज्यव्यवस्थेचा विस्तार करणे.

13) देशातील लोकसंख्या नियंत्रित करणे.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

थोडक्यात, अमर्त्य सेन यांनी कल्याणाच्या विचार करताना दुष्काळ, दारिद्र्य, सामाजिक निवड सामाजिक क्षमता इत्यादी बाबी लक्षात घेतल्या. प्रत्येक वर्षी राष्ट्रीय उत्पन्न झपाट्याने वाढूनही निरक्षरता उपासमार, अपुऱ्या आरोग्य सोयी, यासारख्या समस्या तशाच राहिल्यास देशाची आर्थिक - सामाजिक प्रगती झाली असे म्हणता येणार नाही. सामाजिक संधीचा अभाव, निरक्षरता, कुपोषण या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता सेन यांनी व्यक्त केली.

एखाद्याकडून आर्थिक संधीचा वापर केला गेला तर त्यातून इतरांना आर्थिक संधी उपलब्ध होतात. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत स्त्रियांना महत्त्व दिले पाहिजे. मानवी विकास प्रयत्नांत महिला दुर्लक्षित राहता कामा नये असे सेन यांनी प्रतिपादन केले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# 7. अमर्त्य सेन पुरस्कार

- 1954 चा ॲडम स्मीथ पुरस्कार मिळाला.
- 1981 मध्ये अमेरिकन अकादमी ऑफ आर्ट्स ॲन्ड सायन्सेस् -चे परदेशी मानद सदस्या ही पदवी प्रदान करण्यात आली
- सामाजिक विज्ञान संस्थेने 1984 मध्ये मानद फेलोशिप दिली.
- 1998 मध्ये त्यांना अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले
- 1999 मध्ये मला मानद बांगलादेशी नागरिकत्व बहाल करण्यात आले.
- त्यांना 1999 मध्ये भारत " सरकाकडून " भारतरत्न " मिळाला
- 2000 चा लिओनटीफ पुरस्कार प्राप्तकर्ता
- 2000 मध्ये, त्यांना नेतृत्व आणि सेवेसाठी आयझेनहॉवर पदक देण्यात आले.
- इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सने 2004 मध्ये जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला.
- 2011 राष्ट्रीय मानवता पदक प्राप्तकर्ता
- 2012 मध्ये ऑस्टेक ईगलच्या ऑर्डर देण्यात आला; 2013 मध्ये फ्रेंच लीजन ऑफ ऑनरच्या कमांडरच्या पुरस्कार देण्यात आला.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## ४. अमर्त्य सेन यांच्या विचारांचे मुल्यमापन

अमर्त्य सेन यांनी आपल्या विचारात दुष्काळ, उपासमार, आर्थिक विषमता आदींना स्थान दिले कल्याणकारी अर्थशास्त्रात त्यांनी मौलिक योगदान दिले. देशात लोकशाहीप्रधान, राज्यव्यवस्था असल्यास कल्याणकारी धोरणे व्यवस्थितपणे राबविता येतील असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी लोकशाही, लोकांचे स्वातंत्र्य या बाबींना महत्त्व दिले. दारिद्र्य, दुष्काळ, बेकारी यासारख्या समस्या सोडविण्यासाठी खाजगी क्षेत्र फारसा पुढाकार घेत नाही. यासाठी सार्वजनिक उपाययोजना महत्त्वाच्या ठरतात सेन यांच्या विचारांचे महत्त्व म्हणजे त्यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राला नवीन दिशा दिली. समाज स्थलतील अगदी तळाच्या व्यक्तीच्या गरिबीच्या समस्येचा त्यांनी ऊहापोह केला. देशातील सर्वसामान्य व्यक्तीचे कल्याण कसे साधता येईल, याबाबत त्यांनी मांडलेले विचार महत्त्वपूर्ण आहेत.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# ९. संदर्भसूची

आर्थिक विचारवंतानचा इतिहास या पुस्तकातून अमर्त्य सेन या प्रकल्पातून आपल्याला दिसून येते की अमर्त्य सेन यांचा अर्थशास्त्रात घडवून आणलेले बदल तसेच अमर्त्य सेन यांचे जीवनमान कशाप्रकारे घडले व त्यांनी आपल्या जीवनात कशाप्रकारे बदल घडवून आणला यांचा अभ्यास आपण या प्रकल्पातून करू शकतो.

मी आभारी आहे. की. मा. प्रा. मिनल मॅडम त्यांनी आम्हांला या प्रकल्पातून काही नविन गोष्टी व अमर्त्य सेन यांचा अर्थशास्त्रातील घडवून आणलेला विकास व अमर्त्य सेन यांची जीवनशैलीचा विकास कशाप्रकारे घडवून आणला. तसेच अमर्त्य सेन यांनी आपल्या जीवनात कोणत्या-कोणत्या विषयांचा अभ्यास केला व समाजात कशाप्रकारे जनजागृती घडवून आणण्यासाठी अमर्त्य सेन यांनी आपले विचार मांडले. त्याबद्दल मी खूप आभारी आहे.

अमर्त्य सेन या अर्थशास्त्रज्ञांनावर प्रकल्प बनविण्यासाठी मला आमच्या मा. प्रा. मिनल मॅडम यांनी खूप मदत केली. तसेच प्रकल्प बनविण्यासाठी आम्हांला Notes चा खूप मोठी मोलाची साथ मिळाली.

महाविद्यालयाचे नाव - सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर, ता & जी - पालघर.

विद्यार्थ्याचे नाव - सुजय गणपत घुटे.

वर्ग - तृतिय वर्ष कला

हजेरी क्र - 666

विषय - अर्थशास्त्र (पेपर नं - 18)

प्रकल्पाचे नाव - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्राध्यापक - प्रा. मिनल मॅडम

शैक्षणिक वर्ष - 2022-23

सेमिस्टर - सहावे (6th)

# अनुक्रमणिका


| अ.क्र | मुद्दे | सहि |
|---|---|---|
| 1] | प्रस्थावना | |
| 2] | शिक्षण | |
| 3] | बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना | |
| 4] | दलित शिक्षणसंस्थेची स्थापना | |
| 5] | पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना | |
| 6] | स्त्रियांच्या हक्कांसाठी लढा व कार्य | |
| 7] | धर्मांतराची घोषणा | |
| 8] | अर्थशास्त्रीय कार्य | |
| 9] | पुरस्कार आणि सन्मान | |
| 10] | मानद पदव्या | |
| 11] | संदर्भ सुची | |


Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रस्तावना -
(परिचय)

भिमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल, इ.स 1891 महू, मध्य प्रदेश, ब्रिटिश भारत (सध्या भीम जन्मभूमि, डॉ. आंबेडकर नगर मध्य प्रदेश) राष्ट्रियत्व भारत

आई - भिमाबाई सकपाळ
वडिल - रामजी सकपाळ
पत्नी - रमाबाई आंबेडकर
(विवाह 1906 - निधन - 1935)

मृत्यू - 6 डिसेंबर, 1956 (वय 65)
नवि दिल्ली, भारत,

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

शिक्षण -

- मुंबई विद्यापिठ
- कोलंबिया विद्यापिठ
- लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स
- ग्रेज इन, लंडन
- बॉन विद्यापिठ , जर्मनी

बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थांमधून अर्थशास्त्र विषयात PH.D पदव्या मिळविल्या ; तसेच त्यांनी कायदा, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांवर संशोधन केले. त्यांच्या सुरुवातिच्या कारकिर्दीत, ते एक अर्थशास्त्र , प्राध्यापक आणि वकिल होते. त्यानंतर त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रांत काम केले.

FOR EDUCATIONAL USE

## शैक्षणिक कार्य -

### आंबेडकर

आंबेडकर हे उच्चविद्याविभूषित शिक्षणतज्ज्ञ होते. "शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो ते प्राशन करेल तो वाघासारखा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही." असे त्यांनी लिहिलेले आहे. प्राचिन हिंदू समाजातिल जातिच्या नियमांनुसार कनिष्ठ जातींना शिक्षण घेण्याचा हक्क नव्हता तर केवळ उच्च जातींना शिक्षणाचा अधिकार होता.

त्यामुळे कनिष्ठ जातिंची स्थिति जवळपास गुलामासारखीच झाली होति. शिक्षणामुळेच कनिष्ठ जातिंची स्थिति सुधारेल असा विचार करुन आंबेडकरांनी शैक्षणिक काम केलि.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## शैक्षणिक जागृती -

ऑंबेडकरांच्या मते हजारो वर्षापासून शिक्षण नाकारलेल्या कनिष्ठ जातिंमध्ये अज्ञान व निरक्षरता होती. यामुळे त्यांचे उच्च जाती हलक्या प्रतिची कामे स्वतः न करता कनिष्ठ जातींकडून सक्तीने करुन घेत. ऑंबेडकरांनी कनिष्ठ जातिंना त्यांच्या या दयनिय स्थितिचे कारण शिक्षणाचा अभाव हेच आहे याची जाणिव ऑंबेडकरांनी करुन दिली. कनिष्ठ जातिंच्या लोकांनी त्यांच्या मुलांना शाळेत पाठवावे यासाठी ऑंबेडकरांनी त्यांना प्रोत्साहन दिले. या मुलांना शिष्यवृत्ती, गणवेश, भोजन व निवारा अशा सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या अनुयायांना "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" असा संदेश दिला.

## बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना -

कनिष्ठ जातितील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्यांची सामाजिक - आर्थिक स्थिति सुधारावी म्हणून 20 जुलै 1924 रोजी मुंबई येथे डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभा या संस्थेची स्थापना केली. या संघटनेच्या वतीने सोलापूर येथे 4 जानेवारी 1925 रोजी एक वस्तीगृह सुरु करुन दलित, गरिब विद्यार्थ्यांना निवास, भोजन, कपडे व शैक्षणिक, साधनसामग्री पुरवली.

आंबेडकरांनी या वस्तीगृहास सोलापूर नगरपालिकेकडुन रु - 40000 /- चे अनुदान मिळवून दिले. या संस्थेने सरस्वती विलास नावाचे मासिक व एक मोफत वाचनालय सुरु केले.

# दलित शिक्षणसंस्थेची स्थापना

14 जून 1928 रोजी डॉ. आंबेडकर यांनी दलित शिक्षणाची संस्थेची स्थापना केली. दलितांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय करणे हे या संस्थेचे मुख्य ध्येय होते. माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी पेलण्यास ही संस्था समर्थ नसल्याने दलित विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई सरकारने या संस्थेस मदत करावी असे आवाहन बाबासाहेबांनी केले. त्यामुळे मुंबईच्या गव्हर्नरने 8 ऑक्टोबर 1928 रोजी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 5 वसतिगृहे मंजूर केली. तसेच गव्हर्नरने दरमहा रु 9000 चे अनुदानही वसतिगृहांना खर्चासाठी मंजूर केले. जेव्हा ही रक्कम खर्चासाठी अपुरी पडू लागली तेव्हा डॉ. आंबेडकर यांनी मुस्लिम व पारशी समुदायातील धर्मादाय संस्थांकडून व इतर काही देणगीदारांकडून आर्थिक मदत मिळवली.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना

अस्पृश्यांसह निम्न मध्यमवर्गास उच्च शिक्षण देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 8 जुलै 1945 रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. आंबेडकरांनी या संस्थेच्यावतीने सन 1946 मध्ये मुंबईत सिद्धार्थ कला व विज्ञान महाविद्यालय सन 1950 मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सन 1953 मध्ये मुंबईत सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय तर सन 1956 मध्ये मुंबईत सिद्धार्थ विधी महाविद्यालय सर्व समाजांसाठी सुरु केले. सध्या देशभरात या संस्थेची 30 पेक्षा जास्त महाविद्यालये आहेत.

Sundaram® FOR EDUCATIONAL USE

# स्त्रियांच्या हक्कांसाठी लढा व कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कार्याचा प्रभाव होता.

बाबासाहेबांच्या मते बुध्द हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि अभ्यासक डॉक्टर रुपा कुलकर्णी - बोधी यांच्या मते, 'भारतीय स्त्रीमुक्तीची खरी वैचारिक बैठक भगवान बुध्दांच्या भक्कम अशा समतावादी तत्वज्ञानाच्या पायावर उभी आहे, बाहेरुन आयात केलेल्या एखादया जेंडर बेस्ड विचारावर नाही! आणि कायदयाएवढेच बाबासाहेबांचे महत्वाचे योगदान म्हणजे त्यांनी दिलेली ही शुध्द भारतीय बैठक.

बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगति केवळ पुरुषांचीच नव्हे, तर स्त्रियांची देखिल होणे गरजेचे आहे, हे भान त्यांना विदयार्थिदशेतच आले होते. ते स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

औरंगाबादला त्यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली इथे मुलींनाही प्रवेश दिला.
आणि कामगार स्त्रीला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषांइतकीच मजुरी, बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंद, मजूर व कष्टकरी स्त्रीयांसाठी 21 दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि 20 वर्षांची सेवा झाल्यावर निवृत्तीवेतनाची तरतूद यांसारख्या महत्वाच्या निर्णयांचा उल्लेख करायला हवा. कामगार किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रीला प्रसुती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत, भारतानंतरच अनेक वर्षांनी इतर देशातील महिलांना प्रसुती रजा मंजूर झाल्या आहेत.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# धर्मांतराची घोषणा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोट्यवधी दलितांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करत होते. सवर्णांच्या मनात कधी तरी अस्पृश्यांबद्दल सद्भावना जागृत होईल या आशेवर ते सतत प्रयत्नशील होते. हिंदू धर्मात आपल्याला समतेची वागणूक देण्यात यावी यासाठी त्यांनी मोठा लढा दिला. आधीच्या पाच वर्षापासून नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या जिकरीने लढा चालवीत होते. पण बहुतांश हिंदूना अस्पृश्य कधीच मानवाच्या बरोबरीचे वाटत नव्हते. त्यांना दलित व अस्पृश्य जनता ही नेहमी कुत्र्यामांजरापेक्षाही खालच्या दर्जाची वाटे. याचा एकंदरीत परिणाम असा झाला की बाबासाहेबांनी समतेसाठी केलेला लढा पाच वर्षात मातीला मिळाला. याच दरम्यान जेव्हा नाशिकचा लढा चालू होता तेव्हा बाबासाहेब गोलमेज परिषदेत गुंतून गेले होते, त्यामुळे त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांमार्फत हा लढा सतत पाच वर्षे सुरू ठेवला.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# अर्थशास्त्रीय कार्य

बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रामध्ये अनेक पदव्या प्राप्त केल्या. अर्थशास्त्रामध्ये परदेशात डॉक्टरेट पदवी मिळवणारे ते पहिले भारतीय होते. त्यांनी अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणूनही शिकवणी केली होती. अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी असा युक्तीवाद केला की, औद्योगिकीकरण आणि कृषीवाद भारतीय अर्थव्यवस्थेत वाढ करू शकतात. त्यांनी भारतातील प्राथमिक उद्योग म्हणून शेतीमधील गुंतवणूकीवर भर दिला. शरद पवार यांच्या मते, आंबेडकरांच्या दृष्टीकोनाने सरकारला अन्न सुरक्षा उद्दीष्ट साध्य करण्यास मदत केली. आंबेडकरांनी राष्ट्रीय आर्थिक आणि सामाजिक विकासाचे समर्थन केले. शिक्षण सार्वजनिक स्वच्छता, समुदाय स्वास्थ्य निवासी सुविधांना मूलभूत सुविधा म्हणून जोर दिला. त्यांनी ब्रिटिश शासनामुळे होणाऱ्या विकासाच्या नुकसानाची गणना केली.

# सरकारांमधील कर निर्धारण आणि कर उत्पन्नांचे वाटप

ब्रिटिश राजवटीतील सरकार आणि प्रांतिय सरकारांमधील कर निर्धारण आणि कर उत्पन्नांचे वाटप या विषयावर आंबेडकरांनी PH.D शोधप्रबंध कोलंबिया विद्यापीठात सादर केला होता. त्या प्रबंधात त्यांनी कर उत्पन्न वाटपात कशी सुधारणा करता येईल त्यावर विचार मांडले होते. त्यांच्या या संशोधनाच्या आधारावरच भारतीय करनिर्धारण आणि कर उत्पन्नांचे केंद्र आणि राज्यातील वाटपाचे सुत्र तयार करण्यात आले आहे. 13 व्या योजना आयोगाने सुद्धा आंबेडकरांच्या कर उत्पन्न वाटपाच्या तत्वावर धोरणे आखली आहेत.

# पुरस्कार आणि सन्मान

## राष्ट्रीय सन्मान -

• भारतरत्न :

सन 1990 मध्ये आँबेडकरांना मरणोत्तर "भारतरत्न" हा देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. आँबेडकरांना भारतरत्न देण्याचे भारत सरकारने एप्रिल 1990 च्या पहिल्या आठवड्यात जाहिर केले. आणि 14 एप्रिल 1990 रोजी त्यांना मरणोत्तर भारतरत्न या पुरस्काराने गौरवले गेले. डॉ. आँबेडकरांना दिलेला 'भारतरत्न' पुरस्कार भारताचे राष्ट्रपती रामस्वामी वेंकटरमण यांच्या हस्ते डॉ. सविता आंबेडकर यांनी स्वीकारला. 14 एप्रिल 1990 हा त्यांचा शताब्दी जयंती दिन होता. हा पुरस्कार सोहळा राष्ट्रपती भवनातील दरबार हॉल / अशोक हॉलमध्ये संपन्न झाला होता.

मानद पदव्या

• डॉक्टर ऑफ लॉ -(LLD).
ही सन्मानणीय पदवी 5 जुन 1952 रोजी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने प्रदान केली.

• डॉक्टर ऑफ लिटरेचर (D
ही सन्मानणीय पदवी 12 जानेवारी 1953 रोजी तेलंगना राज्यातिल हैदराबादमधील उस्मानिया विद्यापीठाने प्रदान केली.

• समर्पित विशेष दिन.
7 नोव्हेंबर हा आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिवस महाराष्ट्रामध्ये 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जातो.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# डॉ. बाबासाहेब आँबेडकर यांचे राजनैतिक करियर

डॉ. बाबासाहेब आँबेडकरांनी 1936 ला स्वतंत्र लेबर पार्टी बनवली पुढे 1937 ला केंद्रिय विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पार्टी ने 15 सीट्स जिंकल्या त्याच वर्षी डॉ. आँबेडकरांनी आपले पुस्तक 'द एनीहिलेशन ऑफ कास्ट' प्रकाशित केले, ज्यात त्यांनी हिंदु रुढीवादी नेत्यांची आणि देशात प्रचलीत जाती व्यवस्थेची कठोर निंदा केली, त्यानंतर त्यांनी ~~१८~~ आणखीन एक पुस्तक प्रकाशित केले. 'Who were the shudras?' (शुद्र कोण होते?) ज्यात त्यांनी दलित वर्गाच्या एकसंघ असल्याची व्याख्या केली. 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र्य झाल्याबरोबर डॉ. आँबेडकरांनी आपल्या स्वतंत्र ~~झाल्याबरोबर डॉ.~~ लेबर पार्टि ला अखिल भारतीय अनुसुचित जाती संघ कास्ट पार्टीत परिवर्तीत केले. डॉ. आँबेडकरांची पार्टी 1946 ला झालेल्या भारताच्या संविधान सभेच्या निवडणुकीत चांगले प्रदर्शन करु शकली नाही.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केले भारतिय संविधान

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संविधान निर्मिती मागचा मुख्य उद्देश देशातिल जातिपातीचा भेदभाव आणि अस्पृश्यतेचा मुळापासून नष्ट करणे व अस्पृश्यता मुक्त समाजाची निर्मिती करून समाजात क्रांती आणणे हा होता. सोबतच सर्वांना समानतेचा अधिकार देणे हा होता. २९ ऑगस्ट 1947 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संविधानाच्या मसुदा समितिचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. आंबेडकरांनी समाजातिल सर्व वर्गामध्ये समांतर पुलाच्या निर्माणावर भर दिला त्यांच्या मते देशातिल वेगवेगळ्या वर्गामधील अंतर कमी केले नाही तर देशाची एकता टिकवणे कठीण होईल. या व्यतिरिक्त त्यांनी धार्मिक, लिंग आणि जाति समानतेवर देखिल विशेष भर दिला.

- भारत संविधानाने भारतातिल सर्व नागरिकांना धर्माच्या स्वतंत्रतेचा अधिकार दिला.
- अस्पृश्यतेला मुळापासुन नष्ट केले.
- महिलांना अधिकार मिळवून दिले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# संदर्भ सुचि

मी आभारी आहे की मा. प्रा. मिनल मॅडम यांनी आम्हाला या प्रकल्पातून भारतातिल कर्तृत्वपुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रकल्पासाठी लागणारी माहिती गोळा करण्यास मदत केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर प्रकल्प बनविण्यासाठी मला आमच्या मा. प्रा. मिनल मॅडम यांनी खुप मदत केली. तसेच प्रकल्प बनविण्यासाठी आम्हाला पुस्तकांची आणि www.UPSC/MPSC.in या संकेतस्थळावरील विकिपीडिया वरून माहिती मिळवली, त्यामुळे खुप मोठी मोलाची मद साथ मिळाली.

FOR EDUCATIONAL USE

नावः भरत देवू शिंगडा

कॉलेजचे नावः- सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी पालघर

हजेरी क्रः- 50006

वर्गः- T.Y.BA

शैक्षणिक वर्षः- 2022-23

विषयः- अर्थशास्त्र

प्रकल्पाचे नावः- महात्मा ज्योतिराव फुले

मार्गदर्शकाचे नावः- मिनल मॅडम

सेमीस्टर - सहावे पेपर नं 18

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## ⋆ अनुक्रमणिका ⋆



| अ.क्र | घटकाचे नाव | पृष्ठ क्र | शिक्षकाची सही | गुण |
|---|---|---|---|---|
| 1) | प्रस्तावना | | | |
| 2) | शिक्षणाची उद्दीष्टे | | | |
| 3) | जीवन परिचय | | | |
| 4) | म. फुले यांचे आर्थिक विचार | | | |
| 5) | शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे | | | |
| 6) | शेती सुधारण्यासाठी उपाययोजना | | | |
| 7) | इतर उपाय | | | |
| 8) | कामगारासंबंधीचा विचार | | | |
| 9) | राजकीय विचार / कार्य | | | |
| 10) | निष्कर्ष | | | |
| 11) | सारांश | | | |
| 12) | संदर्भ सुची | | | |



Sundaram® FOR EDUCATIONAL USE

# प्रस्तावना

समाज परिवर्तन आणि मानवी विकास यासाठी शिक्षण हे एक अत्यंत प्रभावी साधन आहे. म्हणुनच समाज परिवर्तन व विकासासाठी अधिकाधिक चांगले शिक्षण घेण्याची व देण्याची धडपड चाललेली आहे. अनेक राष्ट्रांनी उत्तम शिक्षण पद्धतीद्वारे सर्वांगिण विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केलेत. असेच प्रयत्न काही व्यक्ती महाराष्ट्रातही केले आहेत. महात्मा जोतिराव फुले हे क्रांतीकारक, समाजसुधारक थोर विचारवंत आणि प्रबोधक साहित्यीक होते. बहुजन समाजाच्या मुला मुलींसाठी शाळा काढणारे पहिले भारतीय, भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य याची जाणीव करुन देणारे महामानव, शेतकरी व कामगार याची दुःख आणि दारिद्रय निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे सामाजीक कार्यकर्ते, मानवी समानतेची घोषणा करणारे, सत्याचा शोध घेणारे सत्यशोधक होते. त्याना महात्मा गांधीनी महात्मा म्हणून गौरविले. सावकारांची समाज क्रांतीकारक म्हणुन त्यांची प्रशंसा केली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांनी गुरु मानले. यावरुनच महात्मा फुले यांचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. त्यांनी स्त्रिया आणि अस्पृश्ता यांच्या शिक्षणासाठी बहुमोल असे प्रयत्न केले. खरे तर त्याना स्त्रिया शिक्षणाचे जनक असे म्हटले जाते. महात्मा फुले यांनी शिक्षणविषयक विचार शिक्षणांचा संबंध सामान्याचा जीवनाशी व दैनंदीन गरजांशी जोडणे, शिक्षणाचा विचार समाज सापेक्ष संदर्भात करणे, वरिष्ठ होते.

# शिक्षणाची उद्दिष्टे.

(1) शिक्षणाद्वारे व्यक्तीस व्यवसाय करण्यास समर्थन देणे.

(2) धर्म, वंश, जात, व लिंग यांचा विचार न करता व्यक्तीमध्ये मानवतावादी मुल्ये विकसीत करणे.

(3) शिक्षणाचे सार्वत्रीकरण करून स्त्रियांना व वंचीत राहिलेल्या बहुजन समाज व अपेक्षित घटक यांना अग्रक्रमाने शिक्षण देणे न्याय प्रस्थापित करणे.

(4) स्वातंत्र्य, समता, व बंधुप्रेम ही चिरस्थायी मुल्ये विकसीत करून व्यक्तीमत्वाचा चांगला विकास घडविणे व प्रखर राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान, विश्वबंधु व मानवतावादी सहायता ही मुल्ये करणे.

(5) व्यक्तीला चांगले वाईट, सत्य - असत्य याची जाणीव येणेकरीता चिकित्सक दृष्टीकोन विकसीत करणे.

(6) व्यक्तीची सदसद्विवेक बुद्धी, प्रतिभा आणि व्यक्तीस्वांतत्र्याला विकसीत करणे.

(7) शिक्षणाद्वारे चारित्र्य संवर्धन करणे.

(8) अंधश्रद्धा अस्पृश्यतेची निर्मुलन करणे.
ही महात्मा फुले यांच्या विचारातून शिक्षणाची उद्दिष्टे सांगता येतील.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# जीवन परिचय

१९ व्या शतकातील भारताचा एक महान सुपुत्र आजच्या समाजक्रांतीचा जनक ज्योतिराव फुले यांचा जन्म 1827 मध्ये पुणे येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंद होते. तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. गोविंदरावाचे भाजीपाला विकण्याचे दुकान होते. गोविंदरावाला दोन मुले होती. पहिल्या मुलाचे नाव राजाराम आणि दुसऱ्याचे नाव जोती असे होते. लहानपणीच जोतिरावांच्या मातोश्री चिमणाबाई यांचे निधन झाले. गोविंदरावांनी आपले दुकान चालवित नेकीने धंदा करणारे व नितिने चालणारे गोविंदराव आपल्या जातीत प्रतिष्ठित व्यक्ती म्हणुन ओळखले जाते. ते स्वभावाने धार्मिक, शांत आणि धोपट मार्गी होते. जोतिराव सहा वर्षाचे होते. शिक्षण ही ब्राम्हण खरीज इतर जातीने संपादन करण्याची गोष्ट नव्हे अशी समजुत त्या काळात समजुत होती. गोविंदराव फुले यांच्या जातीत त्या काळात कोणी शिक्षण घेतले पुरुष बहुधा नसावेत.

भारतातील ग्रामीण भागात त्या काळात प्रमाणीक शाळाही नव्हत्या. 1813 च्या इंग्रजांच्या सदनेनुसार भारतातील शिक्षण सर्वांसाठी खुले करण्यात आले. त्यामुळे शिक्षणाची नवप्रभात उजाडली. 1836 मध्ये सरकारने स्वखर्चाने पुणे जिल्ह्यातील काही खेड्यातही प्रयोग दाखल ग्राम शाळा सुरु केल्या. त्यात लेखन वाचन शिकविले जात असे. 1862 मध्ये त्या शाळा बंद करण्यात आला. 1824 मध्ये खिस्ती धर्मोपदेशकांनी पुण्यात मराठी शाळा काढल्या.

जोतिरावांनी वयाच्या 7व्या वर्षी प्राथमिक मराठी शाळेत घेतले. याच काळात पुण्यात बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी (Bombay Native Education society) सुरु करण्यात आली. 1840 मध्ये बॉम्बे नेटिव्ह

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

चळवळीपासुन जोतिरावानी घेतलेली स्फुर्ती प्रबळ होती. मानवी समता हक्क आणि मानवी स्वातंत्र्य यांचे ते कैवारी झाले. जोतिरावांच्या विद्यार्थी दशेत महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेविरुद्ध वारंवार लहान-मोठे बंड होत असत. त्याचा परिणाम जोतिराव व त्यांच्या मित्राच्या मनावर झाला. त्याकाळात जेवढे शिक्षण घेता येईल तेवढे जोतिरावानी घेतले. सरकारी नोकरी मीळत असताना स्विकारली नाहि. जोतिरावांच्या जीवनाला कलाटणी मिळाली ती एका ब्राम्हण मित्राच्या लग्नाला गेल्यावर त्याला तेथे मिळालेल्या अपमानापस्द वागणुकीमुळे, त्यांनी सामाजीक क्रांतीचा झेंडा उभारण्याचा ठरविले. धर्माच्या नावाखाली हिंदु समाजाच्या मनावर ज्या दुष्टीने निष्ठुर चालीरीती दुर्भतेने सत्ता चालवित होती. त्याविरुद्ध त्याला लढा करायचा होता. सामाजीक अप्रतिष्ठेच्या कलंकाने जोतिरावांच्या मनात सामाजीक अन्यायविरुद्ध जळजळीत चीड निर्माण केली. त्याचा परिणाम साहजीकच अन्यायविरुद्ध झगडा करण्याच्या निर्णयात झाला.

भारतात मात्र स्त्रि गुलामगिरीच्या बंधनात खितपत पडली होती. हिंदु शास्त्राप्रमाणे स्त्रियांना कनिष्ठ दर्जाच्या देण्यात आले आहे. जोतिरावांनी हिंदु स्त्रि, भारतातील शुद्ध जातीच्या लोकाना प्राचीन सांस्कृतीक गुलामगिरितुन मुक्त करण्याचा विडा उचलला. कोणत्याहि समाजात प्रगतीची स्थित्यतरे घडवून आणण्यासाठि शिक्षणाचा प्रसार करणे आवश्यक असते. स्त्रिया व शुद्र यांना ज्ञानाचे दरवाजे खुले करावयाचे असे जोतिबाने ठरविले. दोघे विचारांची मुलीकरीता एक शाळा काढावी असे त्यांनी ठरविले. स्त्रियांना आपल्या कर्तव्याची जाणीव योग्य प्रकारे झाली, तर समाजाची व देशाची प्रगती झपाट्याने होईल असे त्याना वाटत होते. जोतिरावानी आपली पत्नी याना सावित्रीबाई शिकवीले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

एज्युकेशन सोसायटी आणि सरकारी शाळा याच्या कार्यांचे एकत्रीकरण करण्यात आले. गोविंदरावाच्या मुलाची म्हणजे जोतिरावाची अभ्यासात चांगली प्रगती होती. मुलाच्या शिक्षणाच्या विरुद्ध गोविंदरावांचे कान कोणी तरी फुकले. त्यामुळे गोविंदरावाचे मन फिरले. तरीदेखील जोतिरावाने प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रम पूर्ण केला. त्याना चांगले लिहिता, वाचता येऊ लागते होते. एवढेच नव्हे तर हिशोबही त्याना येऊ लागला होता. शिक्षणामुळे जोतिराव शेतीमध्ये काम करणार नाही असे गोविंदरावाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न ब्राम्हण करकुनाने केला. गोविंदरावाने जोतिरावाला शाळेतून काढले. शाळा सोडल्यावर जोतिराव फुले फावडे, कुदळ, घमेले घेऊन आपल्या वडीलांच्या फळबागेत आणि दुकानात काम करू लागले. जोतिराव यांचे वय 13 वर्षे असताना पुण्याजवळील धनकवडी गावातील झगडे पाटील यांची मुलगी, जी आठ वर्षांची होती. तिच्याशी विवाह झाला. त्या काळात विवाहाच्या काळात मुलाचे इतके लहान वय असे की, लग्न का आणि कशासाठी करतात हेच त्याना कळत नसे. जोतिरावांचा शिक्षणात खंड पडला तरी त्यांची शिक्षणाची ओढ संपली नाही. त्याचे वाचन चालुच होते. त्यावेळी जोतिराव यांचे वर्ष 14 होते. जोतिराव हुशार व करारी वृत्तीचे होते. ते मन लावून अभ्यास करीत त्यामुळे परिक्षेत प्रथमच श्रेणीचे गुण मिळत.

जोतिरावाचे काही ब्राम्हण व मुसलमान मित्र होते. त्यामुळे हिंदु व मुस्लीम धर्मातील रुढि, परपरा सामाजीक पद्धती इत्यादी गोष्टींना माहिती मिळवली परिणामी हिंदु धर्माच्या नावाखाली चालत आलेल्या खोट्या आणि मतलबी रुढिचा अर्थ कळु लागला. स्कॉटीश मिशनरी शाळेत असताना जोतिराव बरेच ज्ञान संपादन केले होते.

# म. फुले यांचे आर्थिक विचार

19व्या शतकातील भारताच्या एक महान सुपुत्र आणि आजच्या समाजक्रांतीचा जनक म. फुले यांनी समाज सुधारण्यासाठी केलेल्या कार्याचा आढावा आपण घेतला पाहिजे. जोतिबा हे काही अर्थशास्त्र नव्हते. त्यांनी मांडलेल्या आर्थिक विचार त्याचा ग्रंथ 'शेतकऱ्याचा आसुड' यात सापडतात. म. फुले यांनी शेतकऱ्याची दैन्यावस्था, भारतीय शेती, शिक्षण, कामगार इत्यादिसंबंधी मांडलेल्या विचारांची येथे अभ्यास करू.

## ① कृषिविषयक विचार :-

माणसाप्रमाणे राष्ट्राच्या जीवनात शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. भारतासारख्या शेतीप्रधान राष्ट्रात तर ते अधिकच महत्त्वाचे. ज्या राष्ट्रातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असतो. त्या राष्ट्राचा विकास शेती विकास शेती विकासावर अवलंबून असतो. भारताला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे जरी झाली असली तरी भारतीय शेतीचे, शेतकऱ्याचे प्रश्न सुटू शकले नाहीत. आजही भारतातील शेतकरी सुखी, समाधानी नाही. आजही निसर्गाच्या कृपेवर जगतो, कर्जबाजारी आणि दारिद्र्यात कसतरी जीवन जगत असतो. 17 सप्टेंबर 1851 रोजी रास्तापेठ येथे मुलींची दुसरी शाळा आणि 15 मार्च 1852 मध्ये तिसरी शाळा काढली. स्त्रि शिक्षण आणि कनिष्ठ वर्गाचे कैवारी म्हणून जोतिबांचे नाव सर्व महाराष्ट्रात गाजत होते. स्त्रि शिक्षणासाठी त्यांनी जे कार्य केले त्याविषयी सरकारकडून त्यांना 200 रुपये किंमतीची शाल बक्षीस देण्यात आली.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# म. फुले यांच्या काळातील भारतीय शेती आणि शेतकरी:-

म. फुले यांनी भारतीय शेतकऱ्यांच्या व शेतीच्या दुरव्यवस्थेची जी कारणे सांगितली आहेत त्यातील काही महत्त्वाच्या कारणांचा आणि त्याचबरोबर भारतीय शेती, शेतकरी यांची परिस्थिती सुधारण्यासाठी सुचविलेल्या उपायांचाही अभ्यास येऊ करू. म. फुले यांच्या मते कोणत्याही देशाचे तीन आधारस्तंभ असतात ते म्हणजे त्या देशातील शेतकरी, सैनिक आणि प्रशासकीय वर्ग. या तीन आधारस्तंभांवर देशाची सुस्थीती अवलंबून असते. म. फुले यांच्या काळात या तीन घटकांपैकी सर्वात पहिला घटक जो शेतकरी यांची निकृष्ट अवस्था होती तर सर्वात उत्कृष्ट अवस्था शेवटच्या घटकाची होती. सैनिकाचा पगार मिळत असे आणि सरकारी अधिकाऱ्यांना पगाराबरोबरच अनेक सवलती मिळत असत. परंतु देशाच्या महत्त्वाच्या आधारस्तंभ जो शेतकरी त्यांची मात्र दयनीय अवस्था होती.

शेतकरी आणि त्याचे आठ-नऊ माणसांचे कुटुंब अष्टप्रहर राबूनही कर्ज व सारा भागविल्यावर एका माणसाला दरमहा 3 रुपये उत्पन्न राहत असे. याउलट एक युरोपियन अधिकारी चैनिवर दरमहा 15 रुपये खर्च करीत असे. इंग्रज सैनिकाचे उत्पन्नही शेतकऱ्यांचे सात पटीने जास्त होते. म. फुले यांच्या मते शेतकऱ्यांचे जीवन दारिद्र्यात कर्ज फेडीत जात असे एवढेच नव्हे तर त्यांचा अंतरही दारिद्र्यातच होतच असते. म. फुले यांनी शेतकऱ्यांचे दारिद्र्याची दुस्थिती होण्याची काही कारणे सांगितली आहेत.

Sundaram®

# शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे:-

भारतीय शेतकऱ्यांच्या दारिद्र्य अवस्थेची, त्यांची हलाखीची परिस्थीती निर्माण होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या त्याची कारणे कोणती ती पाहू.

## ① संस्थानिकाचा अस्त:-

ब्रिटीश येण्यापूर्वी भारतातील संस्थानिकाच्या पदरी मोठे सैन्य असे. त्याचा खर्च आवाढव्य असे. संस्थानिकांना तो भागवित असे. शेतकऱ्यावर त्याचा भार पडत नसे. कारण बरेच शेतकरी सैन्यात नोकरी करीत असत. परंतु पेशव्यांचे राज्य लयास गेल्यावर मराठी सैन्यातील लोक घरी बसले. परिणामी शेतजमीनीवरील भार वाढला. वाजवीपेक्षा जास्त लोक जमीनीवर काम करू लागल्यामुळे शेतीचे उत्पन्न कमी झाले.

## ② जमीनीचे विभाजन व तुकडीकरण:-

कुटुंब वाटपामुळे जमीनीचे लहान लहान तुकडे पाडले जात. भारतातील तात्कालीन वारसा हक्काच्या कायद्यामुळे जमीनीचे लहान तुकडे पाडले जातात. परिणामी या जमीनीच्या या लहान तुकड्यावर आपला व कुटुंबीचा उदरनिर्वाह चालविणे अशक्य होई.

Sundaram® FOR EDUCATIONAL USE

## ब्रिटनमधून वस्तुंची केली जाणारी आयात:

ब्रिटनमध्ये यंत्रावर तयार होणाऱ्या वस्तु भारतात विकल्या जाउ लागल्या. त्यामुळे भारतातील सुतार लोहार इत्यादि लोकांना पूर्वीसारखे काम राहिले नाही. त्यांना विपन्नावस्था प्राप्त झाली. त्याना आपल्या वस्तु सावकाराकडे गहाण टाकाव्या लागतात.

## शेतकऱ्यांचे शोषण:-

शेतकऱ्यांच्या दुरव्यवस्थेला कारणीभूत असणारा घटक म्हणजे त्याचे विविध मार्गाने होणारे शोषण होय. काही वेळा हे शोषण हक्काचे व काही वेळा अडचणींचा गैरफायदा घेऊन, तर काही वेळा शेतकऱ्यांचा अज्ञानाचा प्राप्त झाली. 1886 मध्ये ब्रिटीश सरकारने शेतसारा मोठ्या प्रमाणात वाढविला. 1877-78 मध्ये दुष्काळ आणि जागतिक महामंदी इत्यादी मुळे शेतमालाचे दर कमी झाले. शेतकऱ्यांचे गहाण ठेवावे लागते. शेतीचे गहाण खेत करताना अज्ञानी शेतकऱ्यांनी सरकारी अधिकारी, सावकार यांनी फसवणूक केली. शेतकऱ्यांचा जमीनी हडप केल्या. त्याचप्रमाणे काहींना सावकाराने कर्ज दिले असेल तर व्याजपोटी त्याला जमीनीवर पाणी सोडावे लागते. या शोषणाच्या जोडीलाच धार्मिक विधीचा आणि कर्मकांडच्या नावाखाली शेतकऱ्यांची लुबाडणूक वेगळीच होती. शेतकऱ्याला त्याच्या जन्मापासून मृत्युपर्यंत कोणता ने कोणता धार्मिक विधी करावा लागे. त्यातून अडचणी शेतकरी लुबाडला जाई. अशाप्रकार सर्व बाजुंनी नाडलेला शेतकरी आपली जमीन विकुन, त्याच शेतावर अन्नावरी किंवा वेठबिगारी म्हणुन काम करे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

सावकार सर्व शेतकऱ्यांची कशी लुबाडणूक करतो याचे एक उदाहरण प्रत्यक्ष पाहणीत दिसुन आले. जुन 1878 कॉकरेल नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याला दिसुन आले की, एका शेतकऱ्याने सावकाराकडुन 10 रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यानंतर पुढच्या वर्षी 10 वर्षात कर्जफेड म्हणुन सावकाराला 110 रुपये दिले, तरी त्याच्या नावावर 220 कोटी बाकी होते याचा अर्थ शेतकऱ्याला 33 पट रक्कम भरावी लागली.

## जागतिक मंदी :-

1890 नंतर जागतिक बाजारपेठेत भयंकर मंदीची परिस्थीती निर्माण झाली. भारतातील शेतमालाच्या किमती एकदम कमी झाल्या. 1871 मध्ये एकाने ज्वारी पोत्याची किंमत 3 रुपये होती. परंतु 1874 मध्ये तीच किंमत सव्वा रुपये पोती एवढी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न एकदम कमी झाले. परंतु सरकारने शेतसारा माफही केला नाही. परिणामी काही शेतकऱ्यांना आपल्या जमीनीवर तर काहीना गुरेढोरे विकावी लागली.

## जनावरांची हत्या :-

जोतिबा यांच्या मते मांसाहार करणाऱ्यांची संख्या वाढल्याने गाई बैलांची हत्या होऊ लागली. शेतीच्या मशागतीच्या बैलांची कमतरता जाणवत होती. याशिवाय दुष्काळामुळे गुरांची चाऱ्याअभावी उपासमार होऊन व लाळीच्या रोगासारखे साथीचे रोग होऊन गुरे मरत राहिलेल्या जनावरांना जंगल खात्याच्या जाचामुळे चरायला जागा नव्हती.

# शेतीची व शेतकऱ्याची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना:-

भारतातील शेतकऱ्यांची सावकार सरकारी अधिकारी आणि सवर्ण यांच्या शोषणातून मुक्तता होण्यासाठी शेतकरी समाजातील कनिष्ठ वर्गातील लोकांना त्यांना आपली प्रगती व्हावी असे वाटत असेल, तर या लोकांनी प्रथम विद्या प्राप्त केली पाहिजे विद्याशिवाय बुद्धीचा उपयोग होत नाही बुद्धी नसेल तर धूर्त व स्वार्थी माणसांनी निर्माण केलेल्या जाळ्यातून बाहेर पडण्याची युक्ती सुचणे शक्य नाही. युक्तीशिवाय ज्ञान नाही. ज्ञानाशिवाय शक्ती नाही. ज्ञान महान शक्ती आहे ज्ञानाशिवाय मनुष्य पशु बनतो. शेतकरी अज्ञानी असल्यामुळेच त्यांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे विविध स्तरावर शोषण होते हे थांबविण्यासाठी शेतकऱ्यांना समाजातील कनिष्ठ लोकांना स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी पुढील उपाय सुचविले आहेत.

1. शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण द्यावे. मुलांसाठी वस्तीगृहे काढावीत.
2. खेड्यातील इंग्रजी शाळा बंद कराव्यात.
3. मुलांना शिकविण्यासाठी कनिष्ठ वर्गातील शिक्षकांची निवड करावी. म्हणजे असे शिक्षक मुले आपलीच आहेत म्हणून चांगले शिकवतील.
4. कनिष्ठ वर्गातील शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे.
5. शेतकऱ्यांच्या मुलांना पाट्या, पुस्तके इत्यादी द्यावीत.
6. शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलांना विलायतेतील शेतकरी शाळा सरकारी खर्चाने दाखवून आणाव्यात.

# शेतीत सुधारणा करण्यासाठी उपाय:-

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी, शेतकऱ्यांचे महत्त्व उत्पन्न वाढून त्यांची विपन्नावस्था नाहिशी व्हावी यासाठी म. फुले यांनी सुचवलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

## ① शेतकऱ्याला शेतीसाठी पाणीपुरवठा करावा:-

आज आपण पाणी अडवा, पाणी जिरवा असे म्हणतो परंतु पावसाचे वाया जाणारे पाणी अडविले पाहिजे असे म. फुले यांनी सांगितले म. फुले यांच्या मते सरकारने काळ्या गोऱ्या लष्करावर पोलिस खात्यावरील शिपायाकडून जागोजागी तालीवाजा बंधारे अशा प्रकारे बांधावेत की वळणाचे पाणी फुकट शेतात मुरून नंतर नदितल्या मिळावेत असे केल्याने सुपीक होईल. टेकड्यावर तलाव बांधावेत, नद्यांवर धरणे बांधावीत, नदीचे पाणी विहरित साठवून फळबागासाठी आणि उत्तेजन शेतीचा त्यांचा उपयोग करावा.

## ② सरकारचे उत्तेजन:-

जे शेतकरी सरकारी मदतीशिवाय, मार्गदर्शनाशिवाय विहरी खोदतील त्याना उत्तेजनार्थ बक्षीस द्यावीत.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## खते, गाळ मोफत द्यावा:-

तलाव विहरी यातील गाळ शेतकऱ्यांना मोफत द्यावा. सरकारच्या मालकीची कुरणे जनावराना चरण्यासाठि शेतकऱ्यांना खुली करून द्यावी. बियाणांचा आणि अवजारांचा वापर करणे. नव्या तंत्यज्ञानाने शेती उत्पादन वाढविणे इत्यादि गोष्टीवर म. फुले यांनी भर दिला. म्हणुनच विज्ञाननिष्ठ आणि कृषीज्ञान यांची सांगड घालण्याचा त्यांनी पुरस्कार दिलेला विचार आजही मोलाचा वाटतो.

## ① शेतकऱ्याच्या मुलांना शेतिविषयक शिक्षण द्यावे:-

भारतातील शेतीची सुधारणा व्हावी यासाठि म. फुले यांनी असे सांगितले की, शेतकऱ्याच्या मुलाना शेतीविषक शिक्षण द्यावे. त्यांना परदेशातील शेतीचा विकास दाखाविणे.

## ② कृषिरक्षक योजना:-

म. फुले यांनी खेड्यापाड्यातून कृषिरक्षक योजना राबविली पाहिजे. शेतकऱ्याचे शेतीचे काम संपले की नाही त्यांनी रिकाम्या वेळेत एकत्र आले पाहिजे. उत्पादनावर चर्चा केली पाहिजे. आपल्या बंधुना मार्गदर्शन केले पाहिजे. पालन, पोषण, शिक्षण आरोग्य संस्कार, राष्ट्रप्रेम या गुणांनी परिपूर्ण बालके तयार करणे.

# इतर उपाय

शेतकऱ्याना व शेती उत्पादन वाढीला प्रोत्साहन मिळावे यासाठी म. फुले यानी इतरही उपाय सुचविलेले आहेत.

1. जो शेतकरी जास्त पीक घेईल त्याला उत्तेजनार्थ बक्षिस देणे.
2. शेतकऱ्याना शेतीचे ज्ञान व्हावे यासाठी शेतीची पुस्तके द्यावीत.
3. शेतकऱ्यापासून सरकारला जे उत्पन्न मिळेल त्याचा उपयोग शेतकऱ्याच्या मुलान्च्या शिक्षणासाठी करावा.
4. शेतकऱ्याची व्यापारी मारवाडी याच्याकडून फसवणूक होऊ नये यासाठी सरकारने व्यवहारावर नियंत्रण ठेवावे.
5. शेतकऱ्याना कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करावा.
6. शेतकऱ्याना त्यांच्या भोळ्या समजुतीपासून दुर ठेवणे.
7. पीक संरक्षणासाठी त्याना बंदुकीचे परवाने द्यावीत.
8. लाकुड तोडी विरुद्ध कायदा करावा.

1888 मध्ये भारतात ड्युक ऑफ कनोट हे आले म. फुले यानी त्याना एक निवेदन दिले. या निवेदनात शेतकऱ्याची स्थिती सुधारण्यासाठी जे उपाय सुचविले आहेत ते आजही महत्वपूर्ण आहेत. त्याहीपेक्षा लोकांचा शेतकऱ्याविषयी दृष्टीकोण बदलला हवा. शेतकऱ्याचे शेतकऱ्याचे दरिद्री जीवन सर्वानी जाणून घ्यावे. त्यांचे वास्तव कष्टमय जीवन अवलोकन पाहावे. समाजातील सर्वात महत्वाचा तो घटक आहे. समाजाचा तोच कणा आहे. तेव्हा सुस्थितीवर पाहावे

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# कामगारासंबधीचा विचार:-

देशातील अधिकारी आणि ठेकेदार कामगाराचे शोषण कसे करतात याची जाणीव म. फुले यांनी हाती घेतले. याचे मुंबईतील स्नेही नारायणराव लोखंडे हे गिरणी कामगाराच्या उन्नतीसाठी आणि त्याच्या कष्टमय परिस्थीतीवर बदल घडवून आणण्यासाठी ठरविले. श्री लोखंडे यांनी कामगारांना अडचणीला आणि कष्टाला तोंड द्यावे लागते याची त्यांनी बारकाईने अभ्यास केला. जोतिबाच्या मार्गदर्शनाखाली त्याचा उद्धार करण्याचे काम करण्यास सुरुवात केली. 1875 मध्ये गिरणी कामगाराच्या परिस्थीतीचा अभ्यास करण्यासाठी सरकारने एक मंडळ नेमले. या मंडळाला असे दिसुन आले की स्त्रियांना दर दिवशी जास्त तास राबावे लागते. मुलाना दिवसभर कष्टाची कामे करावी लागतात इत्यादी. मंडळाने या गोष्टीची दाखलच केली नाही. म. फुले यांच्या प्रेरणेमुळे कामगारांच्या गाऱ्हाणाना वाचा फोडण्याचे काम 'दीनबंधू' या साप्ताहिक केले. बहुतेक कामगार ठेकेदार काम करतात. त्याचे वेतन ठरलेली नाही. कामगाराना संघटित करण्यासाठी 1880 मध्ये नारायण लोखंडे यांनी मिल हँड असोसिएशन सोसायटी स्थापन केले. ही भारतातील कामगारांची पहिली संस्था होय. फॅक्टरी मशनीवर कामगाराचा प्रतिनिधी असावा अशी मागणी मान्य करण्यात आली. दारूची दुकाने बंद करण्यात यावीत अशी घोषणा करण्यात आली. आठ वर्षाच्या आतील मुलांना कामावर ठेवू नये. स्त्रियांना कामात सवलती द्यावी कामगाराना मध्यतरी विश्रांतीची सुट्टी द्यावी.

FOR EDUCATIONAL USE

# श्रम प्रतिष्ठसंबधीचे विचार

म. फुले यांना श्रमाला समाजात प्रतिष्ठा मिळावी असे वाटे यांच्या मते जो आयुष्यभर आपल्या हातांनी कोणतेच काम करत नाही त्याला समाजात प्रतिष्ठेने मानले जाते. जो इतरांच्या कष्टावर मजेत जगतो व माणूस 12-14 तास ढोरासारखा राबतो आपल्याबरोबर इतरांच्या पोटपाण्याची काळजी करतो त्याला समाजात काडीमात्र किंमत नसते. श्रमाला प्रतिष्ठा मिळवयास हवी समाजाची श्रमाच्या शिक्षणाशी संबंध जोडुन श्रमाला महत्त्व देणारे व त्या आधारे सामाजीक प्रतिष्ठा प्राप्त करुन देणारे म. फुले भारतातील थोर नेते होते.

# म. फुले साम्यवादासंबधीचे विचार:

म. फुले यांनी शेतकऱ्यांनी आसुड हे पुस्तक शुद्रध शेतकऱ्यासाठी लिहीले आहे. यात सरकारी खात्यात ब्राम्हण अधिकाऱ्यांचे प्राबल्य असल्याने ते अज्ञानी शेतकऱ्यांची पिळवणुक करतात. गोरे अधिकारी व्यसनात, चैनीत गुंग असतात. त्यामुळे शेतकऱ्यांना पोटभर, अन्न, अंगभर वस्त्र मिळत नाही. सावकार शेतकऱ्याकडून कर घेते आणि त्यांचे उत्पन्न कमी करते. त्यांना गरिब करते शेतकरी कर्जबगारी होतात फुले यांच्या मते भारतातील अज्ञानी देवभोळ्या शुद्रध शेतकऱ्यांची स्थिती इतर देशातील लोकांना शेतकऱ्यापेक्षा निकृष्ठ प्रतिची आहे. भारतातील सर्वण शेतकरी धनाढ्य असल्याने मागास वर्गातील शेतकरी गुलामच आहेत. शेतकऱ्यांच्या या दुर्दशेला गोरे अधिकारी जबाबदार आहेत. असे फुले यांचे मत होते.

# बालहत्याप्रतिबंध गृहाची स्थापना:-

त्या काळात विधवांची संख्या लक्षणिय होती. एखाद्या विधवेचे चुकुन वाकडे पाउल पडले तर तिची अवस्था वाईट होत होती. जर एखादी विधवा गर्भवती असेल तर तीला समाजाकडुन फार त्रास सहन करावा लागत होता. तिच्या समोर दोन पर्याय असत एक तर तीने गर्भपात करावा किंवा तिने स्वतः ने आत्महत्या करावी अशा परिस्थीत महात्मा फुलेनी अशा विधवाना न्याय देता यावा म्हणुन 1863 मध्ये बालहत्याप्रतिबंध गृह सुरु केले. त्या संदर्भात सुगळीकडे पत्रके वाटली त्यात असे म्हटले होते की, विधवानो तुम्ही या बालहत्या प्रतिबंध गृहात येउन गुप्तपणे सुरक्षितपणे प्रसुती व्हा. तुम्ही आपले मुल येथे ठेवा किंवा ठेउ नका हे तुमच्या मर्जीवर अवलंबुन आहे. त्या मुलांची सर्व काळजी हे गृह घेईल.

महात्मा फुलेनी सुरु केलेले बालहत्या-प्रतिबंध गृह हे भारतातील पहिले गृह होते या संस्थेची उपयुक्ता पटल्यावर पंढरपुर येथे बालहत्याप्रतिबंध गृह हे होते यांनी उडणेत आले. फुलेनी सावित्रीबाईपासुन मुलबाळ नव्हते म्हणुन गोविंदरावानी महात्मा फुलेनी दुसऱ्या विवाहच्या आग्रह धरला. परंतु पहिल्या पत्नीपासुन मुल होत नाही म्हणुन दुसरी पत्नी करणे गुप्तपणे व सुरक्षित प्रसुती व्हा. तुम्ही आपले मुल या वडीलांच्या आदेशाला त्यांनी डिझकारले आणि बालहत्याप्रतिबंध गृहातील काशीबाई नावाच्या विधवा ब्राम्हण स्त्रियांचा यशवंत नावाचा मुलगा दत्तक घेतला यावरुनच फुले हे जातीवादी नव्हते. ब्राम्हणद्वारे तर अजिबात नव्हते.

# सत्यशोधक समाजाची स्थापना:-

महाराष्ट्र या दरम्यानच्या काळात एक नवसुशिक्षितांची पिढी उदयास आली होती त्यांनी पाश्चात्य राष्ट्रातील सामाजीक संस्थांचे व विचारप्रणालीचे आकलन होते. सामाजीक सुधारणेसाठी शुद्रातिशुद्रांची स्थिती सुधारणेसाठी महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना 24 सप्टेंबर 1873 रोजी पूणे येथे केली. या समाजाच्या मुख्य उद्देश धार्मिक व सामाजीक गुलामगिरी नष्ट करणे हा होता. "सार्वजनिक सत्यधर्म" व "गुलामगिरी" या दोन पुस्तकांत फुलेंनी सत्यशोधक समाजाबद्दल आपले विचार व्यक्त केले आहे. "सर्वसाक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्थी।" हे या समाजाचे ब्रीदवाक्य होते. समता बंधुता स्वातंत्र्यता हे विचार रुजवण्यासाठी त्यांनी हा समाज स्थापन केला, सर्व जाती धर्माच्या लोकांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे व समाजजागृतीचे कार्य व्हावे या हा मागील हेतु होता. कनिष्ठ वर्गाला मानसिक गुलामगिरीतुन मुक्त करणारी ही एक चळवळ होती। "सत्यशोधक समाज" ही समाज सुधारणेची महाराष्ट्रातील पहिली चळवळ होती. या समाजाची उद्दिष्टे किंवा प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

1. सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. परमेश्वर त्यांचा आईबाप आहे.
2. ईश्वर एकच असुन तो निर्माता व निराकार आहे
3. परमेश्वराला भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.

Sundaram® FOR EDUCATIONAL USE

# राजकीय विचार / कार्य :-

विषेशत: महात्मा फुलेंनी अनेक बाबीवर ख्रिश्चन मिशनऱ्याचा प्रभाव होता. भारतीय राज्यपद्धती विषयी बोलताना ते म्हणतात की, भारतीय राज्यपद्धती ही अमेरिकन पद्धतीची असावी. ब्रिटीश पद्धतीची असु नये. महात्मा फुलेना प्रजासत्ताक राज्यपद्धती अपेक्षीत होती. त्यांच्यामध्ये, भारतातील सर्व लोक जोपर्यंत एक होत नाहित, तोपर्यंत भारताला राष्ट्र म्हणणे योग्य नाही. ज्या समाजातील सर्व लोकाना समान हक्क दर्जा मिळत नाही. तोपर्यंत त्या राष्ट्राला राष्ट्र म्हणता येणार नाहि.

ब्रिटीशांनी भारतात राजकीय गुलामगिरी प्रस्थापित केली होती. ती त्याना मान्य नव्हती. विद्यार्थीदेशापासूनच त्यांना या गुलामगिरीतून चीड होती. सामाजीक विषमतेमुळे समाजात पडलेली फुट नष्ट केल्याशिवाय इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त मिळणार नाही. म्हणुन बहुजन समाजावर लादलेल्या सामाजीक आर्थिक धार्मिक गुलामगिरीचे उच्चाटन करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. महात्मा फुले जरी इंग्रजी सत्तेला पाठिंबा दिला असला तरी त्यावेळी शासन बहुजन समाजाच्या उन्नतीच्या आड येत असे त्यावेळी त्यांच्यावर कठोर टिका केली. सरकारचे धोरण जेव्हा शुद्रातिशुद्राच्या विशेषत: शेतकऱ्यांच्या हितसंबधाला घातक आहे असे दिसुन येत आहे त्यावेळी त्यांनी सरकारला टिका केली. सरकारच्या शिक्षणाविषयक धोरणांवरही त्यांनी टिका केली.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# निष्कर्ष

1. महात्मा जोतिराव फुले यांची माहिती मिळवली.

2. महात्मा जोतिराव फुले यांचे विविध महत्व समजुन घेतले.

3. महात्मा जोतिराव फुले विविध प्रकारे मुददयांचा अभ्यास केला.

4. महात्मा जोतिराव फुले यांचे विचारवंताची माहिती मिळवली.

FOR EDUCATIONAL USE

# सारांश

भारतामध्ये शिक्षणासाठी धर्माने लादलेली बंधने तोडुन स्त्रिया आणि अस्पृश्यतासाठी शिक्षणाची दारे मोकळी करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय समाजसुधारक आहेत. अपेक्षित समाजास शिक्षणाच्या मार्गाने समोर जाण्याचे कार्य त्यांनी केले. ते एक सत्य शोधक, समाजसुधारक आहेत. जनसामान्यांनी त्यांना महात्मा म्हणुन गौरविले. ते मानवतावादी होते महाराष्ट्राचे ते मार्टिन ल्युथर म्हणुन ओळखले जातात. तसेच ते भारतातील आद्यशिक्षक म्हणुनही ओळखले जाते. त्यांनी मेकॉलाच्या पाझर पद्धतीला कडाडून विरोध केला होता. महात्मा फुले यांनी पुणे येथे मुलींची पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली होती. तसेच अस्पृश्यासाठीच्या त्यांनी शाळा स्थापन केल्या होत्या. ज्या ठिकाणी अस्पृश्य जातीची वस्ती मोठी असेल तेथे स्वतंत्र शाळा उघडाव्या अशी कळकळीची विनंती राणीच्या जाहिरनाम्यास अनसरून सरकारला केली. हंटर शिक्षण आयोगापुढे महात्मा फुलेंनी एक निवेदन सादर केले होते ते निवेदन म्हणजे शिक्षण पद्धतीच्या मुलमंत्र देणारा दस्तावेज ठरतो. फुले यांनी त्रिभाषा सूत्राचा पुरस्कार केला होता.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# संदर्भ सुची


① http://mr. vikaspedia.in/education.

② www.google.com


Sundaram® FOR EDUCATIONAL USE